[ ]

**<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.२९५/२०१५</u>**

**<u>निशाणी क्र. ६१/अ वर पुढे</u>**

फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०३)

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :- प्रदीप उत्तमराव हिरक

माझे वय :- ५६ वर्ष,

माझा व्यवसाय :- सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे पाथरी

माझा रहिवास :- पाथरी ता. पाथरी, जि. परभणी.

**<u>सरतपास</u>**

<u>अभियोगपक्षा करिता श्री. के.एस. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी वकील</u>

**०१.** पोलीस स्टेशन सेलू येथे मी २०१३ ते २०१९ पोलीस हेड कॉन्सटेबल म्हणून कार्यरत होतो. माझ्याकडे दि. ०२.०९.२०१४ रोजी २२:२५ वाजताच्या दरम्यान पो.नी. श्री माडेकर साहेब यांनी गणपती उत्सव असल्या कारणाने पेट्रोलींग तसेच अवैद्य धंदयाची माहिती काढुन केसेस करणेकामी ए.पी.आय. राठोड साहेब यांच्यासोबत आम्ही पोलीस स्टाफ सह पोलीस जीप क्रमांक एम.एच.२२ डी ७१८८ ने पेट्रोलींग करीता पोलीस ठाण्यातुन निघालो. २२:३५ वाजता क्रांती चौक येथे आल्यानंतर गुपत बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, न्यु हायस्कुल समोरील गेट समोरील मोकळ्या जागेमध्ये लाईटच्या उजेडामध्ये काही लोक बसुन झन्ना-मन्ना नावाचा पैसे लावुन जुगार खेळत आहेत अशी माहिती मिळाली. त्यानंतर श्री. राठोड यांनी दोन पंच बोलावुन घेतले. पंचांना सोबत घेऊन घटनास्थळावर २२:४५ वाजता छापा मारला असता सात इसम गोलाकार बसुन जुगार खेळतांना मिळुन आले. अनंत देवधर, रामा पाडुळे, अर्जुन संघवी, दत्ता कोटुळे, शामसुंदर मोगले, सोमेश्वर वाघे उर्फ लिंबेकर तसेच सचिन धापसे असे सात इसम मिळुन आले.

**०२.** आरोपी अनंत याच्या समोर ५५०/- रुपये, पडुळे याच्या समोर ६००/- रुपये, अर्जुन संघवी याच्या समोर ८००/- रुपये, दत्ता पाडुळे याच्या समोर ५३०/-, शामसुंदर यांच्या समोर ३५०/-, सोमेश्वर वाघे याच्या समोर ३२०/- व लिंबेकर यांच्या समोर ३२०/- व सचिन धापसे याच्यासमोर ४००/- रुपये तसेच आरोपीजवळ शेंदरी रंगाचे बसण्यासाठीचे चवाळे व त्यावर ४४७/- रुपये व पत्ते असा एकुण ४०७०/-

रुपयाचा मुद्देमाल व ५२ पत्ते असा जुगाराचा मुद्देमाल श्री. राठोड याने जागेच पंचनामा करुन त्यावर सहिचे लेबल लावले. त्यानंतर पो.कॉ. ११४५ श्री. शेख यांनी आरोपीं विरुध्द फिर्याद दिली. मी सुरुवातीपासुन शेवटपर्यंत साक्षीदार म्हणुन हजर होतो.

**०३.** मी श्री. शेख यांचे हस्ताक्षर व स्वाक्षरी ओळखतो. आता मला फिर्याद व प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. ते तेच असुन त्यावर श्री. शेख यांची स्वाक्षरी असुन हस्ताक्षर त्यांचेच आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ९८ व ९९** देण्यात येते.

**०४.** श्री.राठोड यांनी घटनास्थळी जप्ती पंचनामा केला. तो पंचनामा करतेवेळी मी त्यांच्यासोबतच होतो. आता मला अभिलेखावरुन सदरचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो मीच लिहीलेला असुन त्यावर श्री. राठोड यांची सही आहे. जप्ती पंचनाम्यास **निशाणी क्र. १००** देण्यात येते.

**०५.** आम्ही छापा टाकला त्यावेळेला वेळ जास्त झालेला असल्याने तेथे इतर कोणी लोक येत नव्हते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

... सरतपास पुर्ण.

## <u>उलटतपास</u>

<u>आरोपीं क्र. ४ व ७ करिता श्री. धायतडक वकील</u>

**०६.** घटनेची माहिती सहा.पो.निरीक्षक श्री. राठोड यांना मिळाली होती. आम्ही पेट्रोलींगला जाण्याकरीता स्टेशन डायरीला नोंद केली होती. मी तपासीक अंमलदार नसल्याने त्या स्टेशन डायरीची नोंद पोलीसांना दिली नाही. हे मला आठवत नाही की, पंचांना लेखी सुचना दिल्या होत्या किंवा कसे. आरोपीं कडुन जप्ती पंचनामा करण्यापुर्वी आमचा अंगझडती पंचनामा केला नाही. आम्ही आरोपींचा ओळखीचा पुरावा तपासला होता. हे मला सांगता येणार नाही की, कोणत्या आरोपींचया हातामध्ये ५२ पत्यापैकी कोणते पत्ते होते. हे मला आठवत नाही की, कोणत्या आरोपींकडुन कोणत्या नोटा जप्त केल्या होत्या. ज्या नोटा जप्त केल्या त्यांचे क्रमांक मी नोंद केले नव्हते. पोलीस ठाण्यात आल्यानंतर घटनेची नोंद केली होती.

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला अवैद्या धंदयाविरुध्द कारवाई करण्याबाबत आदेश असतात. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांना दाखविण्यासाठी आरोपीं

विरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी छापा मारला नाही, आरोपी पत्ते खेळतांना मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही.

**उलटतपास**

आरोपीं क्र. ५ हजर आरोपी क्र. ५ चे वकील श्री. तळणीकर वकील गैरहजर करीता उलटतपास काही नाही.

**उलटतपास**

आरोपीं क्र. ६ करिता श्री. साळवे वकील यांनी आरोपी क्र. ४ व ६ यांनी साक्षीदाराचा घेतलेला उलटतपास त्यांच्या करीता स्वीकारला.

... उलटतपास पुर्ण.

... फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

GAURAV ANANTRAO TARAL

Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL
Date: 2026.08.11 17:32:59 +0530

(जि. ए. तराळ)

दिनांक: ११.०८.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

सेलू जि. परभणी